
## संक्षिप्त वृत्त

### आदर्श पब्लिक स्कूलमध्ये प्रजासत्ताक दिन साजरा

**कुर्डूवाडी** : आदिशक्ती शिक्षण संस्था वेताळवाडी संचलित, आदर्श पब्लिक स्कूल व ज्युनिअर कॉलेज कुर्डूवाडी या ठिकाणी प्रजासत्ताक साजरा झाला. प्रमुख पाहुणे माजी कॅप्टन अजिनाथ बोबडे व नायब सुभेदार अरुण जगताप, संस्थापक अध्यक्ष अमोल सुरवसे , प्रकल्प संचालिका पूजा सुरवसे, संचालिका वर्षा सुरवसे, यांच्या हस्ते ध्वजारोहण केले. विद्यार्थ्यांनी संचलन सादर केले. आरोही जगताप, हर्षदा घाडगे, समर्थ शेजूळ, पार्थ क्षीरसागर या विद्यार्थ्यांनी विचार व्यक्त केले. पूर्व प्राथमिक विभागातील बालचमूंनी देशभक्तीपर गीतावर नृत्य केले. प्रशालेतील विद्यार्थ्यांनी सैनिकांच्या जीवनावर आधारित चित्तथरारक नाटक सादर केल्या. नॅशनल सायन्स ओलंपियाड व इंटरनॅशनल मॅथेमॅटिक्स ओलंपियाड परीक्षेमध्ये पात्र विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

### वीरतपस्वी शिक्षण संकुल



**सोलापूर** : वीरतपस्वी शिक्षण संकुलात महात्मा गांधी यांच्या प्रतिमा पूजनानंतर शहापूरचे सुगुरेश्वर महास्वामी यांच्या हस्ते ध्वजारोहण केले. सहाशिक्षक सतीश म्हमाणे, प्रभुलिंग गवसने यांच्या मार्गदर्शनाखाली स्काऊट व आरएसपी विद्यार्थ्यांनी संचलन केले. क्रीडा शिक्षक हणमंत येळमेली यांच्या मार्गदर्शनाखाली लाठीकाठीचा खेळ झाला. विद्यार्थ्यांची भाषणे झाली. प्रशालेतील विद्यार्थ्यांच्या वाढदिवसानिमित्त भेटवस्तू देऊन,शुभेच्छा देण्यात आल्या. माजी विद्यार्थ्यांनी शाळेस साऊंड बॉक्स व रोपे दिली. विविध कला गुण दर्शनाचा सांस्कृतिक कार्यक्रम झाला. देशभक्तीपर गीतावर विद्यार्थ्यांनी नृत्य केली. खाऊचे वाटप करण्यात आले. कलाशिक्षक पंडित स्वामी यांनी उत्कृष्ट फलक लेखन केले. संस्थेचे संचालक शशिकांत रामपुरे ,पालक शिक्षक संघाच्या उपाध्यक्षा महादेवी जिरोबे, सहसचिवा शैलाराणी अवताडे, मुख्याध्यापक संगप्पा म्हमाणे, डॉ.राजशेखर हिरेमठ, लक्ष्मी पाटील, केदारनाथ बचाटे, लक्ष्मी कंदिकटला, गिरमल बुगडे, संतोष तारके आदी उपस्थित होते. सांस्कृतिक विभाग प्रमुख धनंजय नकाते यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

### एकलव्य आश्रम शाळा, करमाळा

**पंढरपूर** : करमाळा येथील प्रतिष्ठित एकलव्य आश्रम शाळा येथे प्रमुख पाहुणे म्हणून पंढरपूरमधील समाजसेवक मुजम्मील कमलीवाले उपस्थित होते. त्यांचा प्रजासत्ताक दिनानिमित्त सत्कार करण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांसाठी प्रथमोपचार पेटी,थरमामीटर देण्यात आले.

---

### राष्ट्रीय शैक्षणिक धोरणविषयी राजे रामराव महाविद्यालयात कार्यशाळा

**जत** : राजे रामराव महाविद्यालय,जत येथे शिवाजी




विद्यापीठ,कोल्हापूर, राजे रामराव महाविद्यालय,जत व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने शाळा,महाविद्यालय ते विद्यापीठ सेतुबंध जोडणी या विषयासंदर्भातील एक दिवसीय कार्यशाळा झाली. यावेळी डॉ.एस.जी.गावडे यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.महादेव करेन्नवर व डॉ. भिमाशंकर डहाळके प्रमुख उपस्थित होते.डॉ.एस.जी.गावडे यांनी नवीन शैक्षणिक धोरण हे कौशल्य विकास, बहुशाखीय शिक्षण, लवचिकता, शैक्षणिक पतपेढी, आंतरवाशियता, बहुविध प्रवेश, निर्गमन सोय, आभासी शिक्षण विकल्प व भारतीय ज्ञान यंत्रणा यावर आधारित आहे,असे सांगितले. उपप्राचार्य प्रा.महादेव करेन्नवर यांनी सेतुबंधच्या माध्यमातून ते विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे गरजेचे असल्याचे सांगितले. कार्यशाळेचे स्वागत व प्रास्ताविक प्रा.वैभव चांडवले यांनी केले. प्रमुख पाहुण्यांची ओळख डॉ. शिवाजी कुळाल यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.अतुल टिके तर आभार प्रा.नवनाथ लवटे यांनी व्यक्त केले. या कार्यशाळेला महाविद्यालयातील प्राध्यापक व पदवीच्या शेवटच्या वर्षातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

### संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई चित्रपटाचे चित्रीकरण पूर्ण

**मुंबई** : दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर सध्या त्यांच्या संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई' आगामी चित्रपटामुळे चर्चेत आहेत.नुकतंच या चित्रपटाचे चित्रीकरण पूर्ण झाले आहे.यानिमित्ताने चित्रपटाच्या टीमने रॅपअपचे फोटो शेअर केले आहेत.चित्रपटात मुक्ताई'ची, संत ज्ञानेश्वरांची भूमिका कोण साकारणार? याविषयी उत्सुकता असून चित्रपटात काही नवे चेहरे दिसण्याची शक्यता आहे.

# नाटक आणि कलावंताना राजाश्रय मिळाला पाहिजे

## पालकमंत्री चंद्रकांत पाटील; नाट्य संमेलनाचे बीड नाट्य परिषदेकडे हस्तांतरण



**सुराज्य/सोलापूर**

नाटक आणि कलावंताना चांगले दिवस येण्यासाठी लोकाश्रया सोबतच राजाश्रय मिळाला पाहिजे ,असे प्रतिपादन नाट्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष तथा पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.

१०० व्या अखिल भारतीय विभागीय नाट्य संमेलनाचा हस्तांतरण सोहळा नॉर्थकोर्ट मैदानावरील रंगकर्मी नामदेव वठारे रंगमंचावर रविवार दि.२८ जानेवारी रोजी पार पडला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी संमेलनाचे अध्यक्ष जब्बार पटेल, नाट्य परिषद मध्यवर्ती शाखेचे कोषाध्यक्ष सतीश लोटके किशोर महाबोले, निलम शिर्के सामंत, दिपक करंजीकर, अशोक हांडे, अतुल परचुरे, प्र.कुलगुरू लक्ष्मीकांत दामा, प्रा.शिवाजी सावंत, संमेलनाचे कार्याध्यक्ष प्रकाश यलगुलवार, प्रमुख कार्यवाह विजय साळुंके, सहकोषाध्यक्ष अविनाश महागांवकर, मोहन डांगरे, प्रशांत बडवे, प्रिसिजन फौंडेशनच्या सुहासिनी शहा, तेजस्विनी कदम, बीडच्या दीपा क्षिरसागर, दिलीप कोरके, संजय रहाटे आदी उपस्थित होते.

शासनाकडून नाट्य परिषदेसाठी ९ कोटी ३३ लाखाचा निधी मिळाला. त्यातून अनेक स्पर्धा नाट्य परिषद राबवणार आहे. त्याचबरोबर रंगकर्मींसाठी घरकुल, आरोग्य अशा सुविधा उपलब्ध करण्यासाठी नाट्य परिषद प्रयत्न करणार आहे. हे १०० वे नाट्य संमेलन अजून ५ महिने सुरू राहणार असून बीड, लातूर, मुंबई असे संमेलन आयोजन करून शेवटी रत्नागिरीमध्ये समारोप होणार असल्याचे कोषाध्यक्ष सतीश लोटके यांनी सांगितले. सोलापूरचे संमेलन पार पाडण्यासाठी अनेकांनी मदतीचा हात दिला सोलापूरमधील नाट्य परिषदेच्या ८ शाखेच्या सर्व अध्यक्ष आणि पदाधिकारी यांनी प्रचंड मेहनत घेतल्याचे विजय साळुंके यांनी सांगितले.

प्रारंभी पंढरपूर तालुक्यातील कोर्टी येथील सिंहगड पब्लिक स्कुलच्या विद्यार्थ्यांकडून सामुहिकपणे तबला वादन व गीत सादर केले. त्यानंतर १०० व्या अखिल भारतीय मराठी विभागीय नाट्य संमेलन हस्तांतरण सोहळ्याच्या कार्यक्रमाला मान्यवरांच्या हस्ते नटराज पूजनाने सुरूवात झाली. त्यानंतर सोलापूरमधील ज्येष्ठ रंगकर्मींसह अन्य मान्यवरांचे सत्कार करण्यात आले. शेवटी नटराज मुर्ती आणि घंटा बीडच्या नाट्य परिषद शाखेच्या अध्यक्षा दिपा क्षिरसागर यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कृष्णा हिरेमठ यांनी केले.

### पालकमंत्र्यांकडून उत्स्फुर्तपणे घड्याळ भेट

विभागीय नाट्य संमेलनाचे आयोजन यशस्वीपणे करून दाखवल्याबद्दल पालकमंत्री पाटील यांनी सोलापूरच्या नाट्य परिषदेच्या ८ शाखांच्या पदाधिकाऱ्यांचे कौतुक केले. विजय साळुंके यांचे विशेष कौतुक करीत त्यांनी आपल्या हातातील घड्याळ रंगमंचावरच काढून विजय साळुंके यांना भेट दिले.

### नटरंग स्मरणिका प्रकाशन

नाट्यसंमेलनाच्या निमित्ताने सोलापूर नाट्य परिषद शाखेच्या वतीने सोलापूरमधील नाट्यक्षेत्रातील विविध घडामोडीचा आढावा घेणारी नटरंग नावाची स्मरणिका काढली होती. त्याचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. स्मरणिकेच्या संपादक रंगकर्मी शोभा बोल्ली यांचा सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना बोल्ली यांनी मी कन्नड भाषिक आणि माझा नवरा तेलगू भाषिक असतानाही मला मराठी नाट्य संमेलनाच्या स्मरणिका काढण्याचा आणि त्याचे संपादन करण्याचा मान मिळाला हे माझे भाग्य असल्याचे सांगितले.



## डॉ. वसंत लवंगे यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान

**सुराज्य/सोलापूर**

मोहोळ डॉक्टर असोसिएशनतर्फे डॉ. वसंत लवंगे यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

डॉ. वसंत लवंगे यांनी ८० टक्के सामाजिक सेवा व २० टक्के वैद्यकीय सेवा या माध्यमातून व्यवसाय चालू ठेवला. निरस्वार्थीपणे समाजसेवा करणे, असंख्य पायी दिंडींना मोफत औषधोपचार करणे, अनेक विविध आजारांचे शिबिर आयोजित करून रुग्णांना मार्गदर्शन करणे व विविध सामाजिक गोष्टींमध्ये आवड, वैद्यकीय सेवेमध्ये चांगला हातखंड असणे आदी सर्व गुणसंपन्न व्यक्तिमत्वामुळे त्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

डॉ. वसंत लवंगे ग्रामीण भागात असूनही सर्वांचे लोकप्रिय आहे. त्यामुळेच रविवारी मोहोळ डॉक्टर्स असोसिएशन तर्फे 'जीवन गौरव 'पुरस्कार देऊन सन्मानित केल्याचे मोहोळ डॉक्टर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. झाडबुके यांनी सांगितले. संस्थेचे सेक्रेटरी डॉ. उमेश मेंडगुळे, डॉ. धनंजय घाटुळे, डॉ.मिलिंद लामगुंडे, डॉ. पाटील तसेच विविध डॉक्टर व पदाधिकारी या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

## रोटरी क्लब ऑफ सोलापूरच्यावतीने व्यावसायिक पारितोषिके प्रदान

**सुराज्य/सोलापूर**



रोटरी क्लब ऑफ सोलापूरच्यावतीने वोकेशनल मंथ निमित्त व्यावसायिक पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. मेसन हॉल येथे दि. २६ जानेवारी रोजी विशेष कार्यक्रमात हा पुरस्कार वितरण सोहळा पार पडला.

समाजातील वेगवेगळ्या व्यवसायामध्ये अत्यंत निरपेक्षपणे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची या पारितोषिकासाठी निवड रोटरी क्लब ऑफ सोलापूरच्या वतीने करण्यात येते. पारितोषिक वितरणासाठी रोटरी क्लब ऑफ उमरगा येथील पास्ट डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रो. रवींद्र साळुंखे आवर्जून उपस्थित राहिले. त्यांनी सर्व पारितोषिक विजेत्यांचे कौतुक केले आणि रोटेरियन्सना मार्गदर्शन केले. कार्यक्रमास क्लबचे एजी रो. राजन वोरा, पिडीजी रो. डॉ. राजीव प्रधान, क्लबच्या अध्यक्षा डॉ. ज्योती चिडगुपकर, सेक्रेटरी विद्या मनुरे, वोकेशनल डायरेक्टर शिवाजी उपरे , पास्ट प्रेसिडेंट सलाम शेख, अय्यंगार तसेच पारितोषिक विजेत्यांचे कुटुंबीय उपस्थित होते. सर्व पारितोषिक विजेत्यांचा शिल्ड आणि भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. फौजदार चावडी पोलीस स्टेशन यांचा फिरती शिल्ड देऊन विशेष सत्कार करण्यात आला.

**पारितोषिक विजेते :** सर्वोत्कृष्ट पोलीस स्टेशन– फौजदार चावडी पोलीस स्टेशन, सर्वोत्कृष्ट पोलीस कर्मचारी– जगदीश हुल्ले, सर्वोत्कृष्ट रेल्वे इंजिन ड्रायव्हर – स्नेहल अंबरकर, सर्वोत्कृष्ट एसटी ड्रायव्हर– दत्तात्रय रगडे, सर्वोत्कृष्ट नर्स– राजश्री हसरमणी (यशोधरा हॉस्पिटल), सर्वोत्कृष्ट जनमित्र (एमएसईबी)– शोभा जाधव, सर्वोत्कृष्ट हॉटेल कर्मचारी– सिद्धाराम पुजारी ( हॉटेल सूर्या), सर्वोत्कृष्ट शोरूम कर्मचारी– ओंकार वैद्य(पीएनजी पेढी)

दि.२५ जानेवारी २०२४. मोहोळ डॉक्टर असोसिएशन तर्फे डॉक्टर श्री वसंतराव लवंगे यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार देण्यापाठीमागचा प्रमुख हेतू म्हणजे ८०% सामाजिक सेवा व २०% वैद्यकीय सेवा या माध्यमातून व्यवसाय चालू ठेवला. निरस्वार्थीपणे समाजसेवा करणे, असंख्य पायी दिंडींना मोफत औषध उपचार करणे, अनेक विविध आजारांचे शिबिर आयोजित करून रुग्णांना योग्य मार्गदर्शन करणे व विविध सामाजिक गोष्टींमध्ये आवड असणे त्याचबरोबर वैद्यकीय सेवेमध्ये चांगला हतखंड असणे या सर्व गुणसंपन्न व्यक्तिमत्वामुळे ग्रामीण भागात असूनही सर्वांचे लोकप्रिय असलेले डॉक्टर श्री वसंतराव लवंगे यांना आज मोहोळ डॉक्टर्स असोसिएशन तर्फे 'जीवन गौरव 'पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. असे मोहोळ डॉक्टर असोसिएशनचे अध्यक्ष डॉक्टर झाडबुके यांनी सांगितले.

## आपुलकी प्रतिष्ठानतर्फे शिरभावीच्या होवाळ कुटुंबास शेळी भेट



**सुराज्य/सांगोला**

कुटुंबातील कर्ता पुरुष गेल्यामुळे अडचणीत आलेल्या शिरभावी येथील होवाळ कुटुंबियांना उदरनिर्वाहाचे साधन म्हणून आपुलकी प्रतिष्ठानच्या वतीने शेळी भेट देण्यात आली.

शिरभावी येथील सरूबाई महादेव होवाळ या आपल्या तरुण मुलाच्या आकस्मिक निधनानंतर गेल्या १० महिन्यांपासून आपल्या दोन लहान नातवांचा प्रतिकूल परिस्थितीत सांभाळ करत असल्याची माहिती आपुलकी प्रतिष्ठानला मिळाल्यानंतर आपुलकी प्रतिष्ठानच्या वतीने या होवाळ कुटुंबीयांना उदरनिर्वाहाचे साधन म्हणून रविवारी दोन पिलांची शेळी भेट देण्यात आली.

त्याचबरोबर अमेरिकेत वास्तव्यास असलेले आपुलकी सदस्य डॉ. राजाराम ढोले यांच्याकडून होवाळ कुटुंबातील या लहान बहिण भावांना कपडे भेट देण्यात आले. यावेळी आपुलकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र यादव, प्रभाकर सरगर, महादेव दिवटे, अरविंद केदार, काशिलिंग सरगर, अरविंद डोंबे गुरुजी, प्रसन्न कदम आदीसह सखुबाई वाघमारे, गोरख लेंडवे आदी उपस्थित होते.

## आरक्षणाच्या निर्णयावर सामान्य ओबीसी बांधव मराठ्यांच्या बाजूने : चंद्रकांत पाटील



**सुराज्य/सोलापूर**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मराठा आरक्षणाच्या निर्णयामुळे ओबीसी आरक्षणाला धक्का लागला नाही. आरक्षणाच्या निर्णयावर सामान्य ओबीसी बांधव हा मराठ्यांच्या बाजूने आहे. ओबीसी नेत्यांची विधाने ही राजकिय आहेत, असे मत पालकमंत्री चंद्रकात पाटील यांनी रविवारी व्यक्त केले.

विभागीय नाट्य संमेलनाच्या समारोप कार्यक्रमाला जाण्यापूर्वी पालकमंत्री पाटील यांनी पत्रकारांशी संवाद साधला. पाटील म्हणाले, कुणबी नोंदी असलेल्यांना कुणबी जात प्रमाणपत्रे द्या अशी मनोज जरांगे-पाटील यांची मागणी होती. कुणबी दाखल असलेल्या बांधवांच्या सगेसोयऱ्यांनाही कुणबी प्रमाणपत्र द्या अशीही त्यांची मागणी होती. ही मागणी मान्य केल्यामुळे मनोज जरांगे-पाटील खुश झाले. या निर्णयामुळे ओबीसींच्या आरक्षणालाही धक्का लागला नाही. कुणबी नोंदी नाहीत अशा मराठा समाजासाठी खूप मोठे सर्वेक्षण सुरू आहे. फेब्रुवारी महिन्यात विशेष अधिवेशन घेउन ज्यांच्याकडे कुणबी नोंदी नाहीत अशा मराठा समाजातील तरुण-तरुणींना नोकरी आणि शिक्षणातील आरक्षण दिले जाईल याची खात्री आहे. आता आपल्याला यापुढील काळात आर्थिक मागासांच्या १० टक्के आरक्षणाकडेही लक्ष द्यावे लागेल. ज्या सुविधा ओबीसींमधील आरक्षणाला आहेत त्या सुविधा आर्थिक मागासांना मिळायला हव्यात.

ज्यांच्याकडे कुणबी नोंदी सापडल्या त्यांना कुणबीतून आरक्षण मिळेल. सयेसोयऱ्यांना कुणबी प्रमाणपत्र मिळतील. कुणबी नोंदी नाही त्यांना मराठा समाजाचे वेगळे आरक्षण मिळेल. या सर्वांवर मोठे उत्तर हे १० टक्क्यांचे आर्थिक मागासांचे आरक्षण हे आहे, असेही पालकमंत्री पाटील यांनी सांगितले.

## राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या शहराध्यक्षपदी संगीता जोगधनकर

### कार्याध्यक्षपदी चित्रा कदम

**सुराज्य/सोलापूर**





राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी नुकतेच सोलापूर शहर राष्ट्रवादी काँग्रेस महिला शहराध्यक्षपदी संगीता जोगधनकर यांची निवड केली. कार्याध्यक्षपदी चित्रा कदम यांची नियुक्ती केली आहे.

राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली या निवडी केल्याचे चाकणकर यांनी सांगितले. तसेच नुतन पदाधिकाऱ्यांना शुभेच्छाही दिल्या. जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस महिला निरीक्षक दिपाली पांढरे यांनी या निवडीबद्दल दोन्ही पदाधिकाऱ्यांना अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

संगीता जोगधनकर या राष्ट्रवादी काँग्रेस फादरबॉडीमध्ये सरचिटणीस या पदावर कार्यरत होत्या. वीरशैव कक्कय्या समाज महिला संस्थापिका अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. चित्रा कदम ह्या राष्ट्रवादी महिला काँग्रेसमध्ये गेली अनेक वर्ष शहर सचिव या पदावर काम करीत होत्या.नुतन पदाधिकाऱ्यांचे जिल्हाध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान, गटनेते किसन जाधव यांनी अभिनंदन केले.

## सुलेरजवळगे ते तडवळ रस्त्यासाठी नऊ कोटी मंजूर

**सुराज्य/अक्कलकोट**

### आमदार सचिन कल्याणशेट्टी यांची माहिती



मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या दुसऱ्या टप्प्यातील निधीतून बहुप्रतीक्षेत असलेला सुलेरजवळगे ते तडवळ या रस्त्याच्या सुधारणेसाठी नऊ कोटी छत्तीस लाख रुपये एवढी रक्कम मंजूर झाल्याचे आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी सांगितले.

तडवळ व सीमावर्ती भागातील अनेक गावातून सुलेरजवळगे मार्गे सोलापूरला येण्यासाठी रस्त्याची अडचण होती. गावकऱ्यांच्या सुविधेचा विचार करून त्याच्या दर्जात सुधारणा करून पायाभूत सुविधांमध्ये वाढ करण्यासाठी आ. कल्याणशेट्टी यांनी सातत्याने पाठपुरावा केला. आता नऊ कोटी छत्तीस लाख रुपये एवढा निधी मंजूर करून घेतला आहे. त्यामुळे सतत या रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांना दिलासा मिळणार आहे. या कामी मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा क्रमांक दोनच्या संशोधन व विकास अंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील रस्त्यांची दर्जोन्नती करण्यासाठीच्या योजनेतून निधी मंजूर झाला आहे. रस्ता हा सुमारे ६.८५० किलोमीटर इतक्या लांबीचा असून पूर्ण झाल्यानंतर त्याची पाच वर्ष देखभाल आणि दुरुस्ती देखील होणार आहे. यासाठी साधारणतः ५७.२९ लाख एवढा निधी प्रस्तावित केला आहे. काम हे ग्रामविकास विभागाच्या अधिनस्त असलेल्या महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्थेमार्फत प्रधानमंत्री सडक योजनेच्या धर्तीवर व ग्रामविकास विभागाच्या अटी व शर्तीवर कार्यान्वित करण्यात येणार आहे. मंजुरीसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांचे आमदार कल्याणशेट्टी यांनी आभार मानले.

निवडणुकीच्या काळात तडवळ भागातील सर्वच रस्त्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधी खेचून आणण्याचा मी मतदारांना शब्द दिला होता. यासाठी इतर सर्व रस्त्यांना निधी मिळालेला आहेच परंतु याचबरोबर तडवळ ते सुलेरजवळगे या रस्त्यास देखील मंजूर होणे तितकेच महत्त्वाचे होते. यासाठी सतत पाठपुरावा करून निधी मंजूर करून घेतला आहे.

**– सचिन कल्याणशेट्टी, आमदार, अक्कलकोट**